# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६८ वी बैठक दिनांक २८ सप्टेंबर २०११

**ठराव**

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ६८ वी बैठक दि. २८ सप्टेंबर २०११ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. श्री. वल्लभ बेनके | ... | वि.स.स. व उपाध्यक्ष (मकृखोविम) |
| ३. | मा. इं. ए. बा. पाटील | ... | प्रधान सचिव (जसं) व सदस्य |
| २. | मा. इं. चं. स. मोडक | ... | सचिव (लाक्षेवि) व सदस्य |
| ३. | इं. दी. रं. कंदी | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. रा. मा. भुते, उप सचिव | ... | प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी |
| २. | श्री. मधुकर स. कांबळे, अवर सचिव | ... | प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |
| ३. | श्री. चंद्रकांत कृ. मोरे, कक्ष अधिकारी | ... | अप्पर मुख्य सचिव (म व पु) व सदस्य यांचे प्रतिनिधी |
| ४. | श्री. वि. नि. ढमाळ, कक्ष अधिकारी | ... | अप्पर मुख्य सचिव (म व पु) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. शि. मा. उपासे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. चं. आ. बिराजदार | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| ३. | श्री. अ.स. शिरुडे | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मकृखोविम) |
| ४. | इं. अविनाश सुर्वे | .... | अ.अ., पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे |
| ५. | इं. अ. सु. ननवरे | ... | अ. अ. व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,पुणे |
| ६. | इं. पं. छ. घोलप | ... | अ.अ. कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली |
| ७. | इं. दि. मा. सोनवलकर | ... | अ.अ. व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे |
| ८. | इं. ब. दा. तोंडे | ... | अ.अ. भीमा कालवा मंडळ, सोलापूर |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(इंजि. दीपक रं. कंदी)** | **(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)** |
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६८ वी बैठक दिनांक २८ सप्टेंबर २०११

### ठराव

ठराव क्र. ६८/१

"नियामक मंडळाच्या ६६ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."

ठराव क्र. ६८/२

"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ६७ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत."

ठराव क्र. ६८/३

''ठराव करण्यांत येतो की, सन २००९-१० या वर्षाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या लेखापरिक्षणानंतर महालेखापाल, मुंबई यांनी निर्गमित केलेला अलग लेखापरिक्षण अहवाल (S.A.R.) अनुपालनासह विधानमंडळासमोर सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे''.

ठराठ क्र. ६८/४

"ठरात करण्यात येतो की, डिंभे डावा कालवा कि.मी.१३ मध्ये भराव फुटल्यामुळे २२ बाधित शेतक-यांना नुकसान भरपाई रक्कम रु.११,७९,८०९/- (रु.अकरा लक्ष एकोणऐंशी हजार आठशे नऊ फक्त) संबंधितास अदा करण्यास मा.मंत्री, जलसंपदा (कृखो) व अध्यक्ष यांनी मान्यता दिलेल्या प्रस्तावास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे."

ठराव क्र. ६८/५

"ठराव करण्यात येतो की, उचंगी ल.पा.तलाव, ता.आजरा, जि.कोल्हापूर जलाशयाच्या डाव्या तीरावरील पूर्ण संचय पातळीच्या वरील प्रकल्पग्रस्तांची ५ घरे संपादित करण्यास खास बाब म्हणून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे".

ठराव क्र.६८/६

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. दीपक रं. कंदी) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

### नियामक मंडळाची ६८ वी बैठक दिनांक २८ सप्टेंबर २०११

"ठराव करण्यात येतो की, टेंभू प्रकल्पांतर्गत सांगोला तालुक्यातील सांगोला मुख्य कालवा कि.मी.२६ ते ५० मधील मातीकाम, बांधकाम व अस्तरीकरणाची कामे व सांगोला कालवा कि.मी.१ ते ५० मधील वितरण व्यवस्थेची कामे सांगोला तालुका सहकारी साखर कारखाना लि., वाकी (शिवणे) यांचेमार्फत स्वबळावर करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या कार्यवाहीस स्थगिती देण्यात येत आहे. यापूर्वी साखर कारखान्यांना दिलेली कामे, त्या कामांची प्रगती, गुणवत्ता व आता मागणी केलेल्या कामांच्या तपशीलासह विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा."

ठराव क्र. ६८/७

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या अंतर्गत विविध मोठया, मध्यम व लघु प्रकल्पांच्या पुनर्वसनाच्या नागरी सुविधांच्या कामांच्या दुरुस्ती कामांची प्रकरणनिहाय आवश्यकता तपासून प्रत्येक कामास कालमर्यादा व वित्तमर्यादा घालावी व त्यामुळे निर्माण होणा-या हस्तांतरपूर्व दायित्वास मा.मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) तथा अध्यक्ष, मकृखोविम यांची मान्यता घेऊन कामे हाती घेण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६८/८

"ठराव करणेत येतो की, खटाव तालुक्यातील टंचाई सदृश परिस्थितीमध्ये उरमोडी उपसा सिंचन योजना कार्यान्वित करुन पिण्यासाठी व जनावरांसाठी सोडणेत आलेल्या पाण्याच्या आवर्तनासाठी आवश्यक ₹ ४६.६२ लक्ष इतकी रक्कम उरमोडी प्रकल्पाच्या अनुदानातून खास बाब म्हणून खर्च करण्यास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६८/९

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या "कृषी संजीवनी योजना २०११" या योजनेचा लाभ मिळण्यासाठी म्हैसाळ टप्पा क्र.१ ते टप्पा क्र.५ चे जानेवारी २०११ ते डिसेंबर २०११ पर्यंतच्या विद्युत देयकांची अदायगी विहीत कालावधीत होण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार सदर देयके म्हैसाळ भागासाठी ए.आय.बी.पी. व्यतिरिक्त अन्य उपलब्ध असलेल्या अनुदानातून अथवा महामंडळास मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेतून अदा करण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६८/१०

"ठराव करण्यात येतो की, ताकारी उपसा योजना अंतर्गतचे टप्पा क्र.१ व २ चे उच्च दाबाचे डिसेंबर-२०१० अखेरचे थकीत वीज देयकाची रु.३०,८४,२५७/- इतकी रक्कम ए. आय. बी. पी.

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. दीपक रं. कंदी) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६८ वी बैठक दिनांक २८ सप्टेंबर २०११

व्यतिरिक्त अन्य निधी स्त्रोतातून अथवा महामंडळास मिळणाऱ्या व्याजातून कृषी संजीवनी योजनाअंतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस अदा करणेस नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे. तसेच योजनेची एप्रिल २०११ ते डिसेंबर २०११ पर्यंतच्या विद्युत देयकांची अदायगी विहित कालावधीत होण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार सदर देयकेही अे. आय. बी. पी. व्यतिरिक्त अन्य निधी स्त्रोत अथवा महामंडळास मिळणाऱ्या व्याजातून अदा करण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६८/११

"ठराव करण्यात येतो की, जे प्रकल्प अे.आय.बी.पी., नाबार्ड अंतर्गत विहीत मुदतीत पूर्ण करावयाचे आहेत व ज्या प्रकल्पांवर सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट आहेत अशा प्रकल्पांच्या लाभक्षेत्राचे सर्वेक्षण, अन्वेषण, संकल्पन, अंदाजपत्रके व नकाशे इ. कामे खाजगी अभिकरणामार्फत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव ६८/१२

"ठराव करण्यात येतो की, पानशेत, ता. वेल्हे व मौजे कुरवटी, ता. वेल्हे, जि. पुणे येथील एकूण २.५९ हे. जमीन व विश्रामगृह हे पानशेत व वरसगांव या धरणांच्या सुरक्षा पट्टयात येत असल्याने धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने सदरची जमीन व विश्रामगृह महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे वर्ग न करता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने भरलेली रक्कम रु. ३६.३४ लक्ष त्यांना परत करुन सदरची जमीन व विश्रामगृह महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या ताब्यात ठेवण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६८/१३

"ठराव करण्यात येतो की, म्हैसाळ पंपगृह टप्पा क्र. १ ते ५ येथील पंपांची देखभाल-दुरुस्तीसाठी रु. ४३.७५ कोटी एवढा खर्च कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पास वर्ष २०११-१२ करीता उपलब्ध असलेल्या अे. आय. बी. पी. निधीतून करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

ठराव क्र. ६८/१४

"ठराव करण्यांत येतो की, शासन निर्णय क्र. मजसुप्र.१००७ / (४६३/०७)/ (लाक्षेवि) (कामे) दि. २७-०५-२००८ मध्ये नमूद केलेप्रमाणे पाणी वापर सहकारी संस्थांना पाटबंधारे खात्याकडील

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(इंजि. दीपक रं. कंदी)** | **(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)** |
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

नियामक मंडळाची ६८ वी बैठक दिनांक २८ सप्टेंबर २०११

०.०२ हेक्टर कार्यालयीन इमारतीसाठी प्रचलित दराने भाडेपट्टयाने देण्याबाबतचे अधिकार मा. मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे मान्यतेने कार्यकारी संचालक यांना प्रदान करण्यांस नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्र. ६८/१५

"ठराव करण्यात येतो की, श्री. ज. आ. निंबाळकर, रा. कुरवली खु. ता. फलटण यांनी मागणी केलेली बाणगंगा तलावाजवळील १० एकर जमीन दिर्घ मुदतीने भाडेपट्टयाने देणेबाबत वकीलांचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करावी."

ठराव क्र. ६८/१६

"ठराव करण्यात येतो की, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांचे ताब्यात असलेल्या जमीनीपैकी घनकचऱ्यासाठी उपलब्ध असलेल्या २४५.२२ हे. विखुरलेल्या क्षेत्रावरील घनकचरा जाहीर लिलावाद्वारे उचलण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. मात्र सदर जमीन महामंडळाच्याच ताब्यात राहील. याबाबतची उचित कार्यवाही वकीलांच्या सल्लयाने करण्यात यावी"

ठराव क्र. ६८/१७

"ठराव करण्यांत येतो की, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सातारा यांनी मागणी केल्याप्रमाणे व पाटबंधारे खात्याच्या ताब्यातील गट क्र. ६४/५ मधील ०.७५ हेक्टर व गट नं. ६५/५/१ मधील ०.११ मधील अशी एकूण ०.८६ हेक्टर क्षेत्र भविष्यात खात्यास लागणार नसल्याने व शासन परिपत्रक क्र. एलएनडी-१००१/ ९१४/ (२८०/२००१)/ सिं.४, दिनांक २६-०७-२००२ अन्वये अतिरिक्त असलेली व भविष्यात खात्यास लागणार नसल्यास जिल्हाधिकारी, यांचेकडे वर्ग करणेबाबत शासन निर्देश असल्याने व सदरची अतिरिक्त जमीन प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटपासाठी जिल्हाधिकारी, सातारा यांना आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे कायमस्वरुपी वर्ग करण्यांस नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्र. ६८/१८

"ठराव करण्यात येतो की, कण्हेर धरणासाठी संपादित केलेली जोतिबाची वाडी (सायगांव), ता. जि. सातारा येथील बुडीत क्षेत्राबाहेरची ४.१० हे. जमीन श्री. प्रकाश जोतिराम अहिरे यांना मत्ससंवर्धन व मत्स्य शेतीसाठी महामंडळाच्या प्रचलित दराने भाडेपट्टयाने प्रथम एक वर्षासाठी व

"मान्य"

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(इंजि. दीपक रं. कंदी)** | **(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)** |
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६८ वी बैठक दिनांक २८ सप्टेंबर २०११

तद्‌नंतर आवश्यकता वाटल्यास दरवर्षी मूळ भाडेपट्टयाच्या १० टक्के भाडेवाढीच्या अटीवर वकीलांच्या सल्ल्याने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६८/१९

"ठराव करण्यात येतो की, राजाराम तलाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील दोन एकर जमीन अर्थमुव्हींग कॉट्रॅक्टर्स अँड मशिनरी ओनर्स असोसिएशन, कोल्हापूर यांना नर्सरी व्यवसाय करण्यासाठी महामंडळाच्या प्रचलित दराने भाडेपट्टयाने प्रथम एक वर्षासाठी व तद्‌नंतर आवश्यकता वाटल्यास दरवर्षी मूळ भाडेपट्टयाच्या १० टक्के भाडेवाढीच्या अटीवर वकीलांच्या सल्ल्याने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषय

ठराव क्र. ६८/२०

"ठराव करण्यात येतो की, शासनाच्या जलसंपदा विभागाच्या दि.१०/०८/२०११ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र. २ अन्वये प्रसृत केलेल्या सूचनेचा शासन स्तरावरुन फेरनिर्णय होणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करणेसाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६८/२१

"ठराव करण्यात येतो की मौजे खेड ता. जि. सातारा येथील कृष्णानगर पाटबंधारे वसाहतीमधील विविध जागा (अंदाजे क्षेत्र १७,१३,४७५ चौ फुट) P.P.P. व्दारे विकसित करुन महामंडळाच्या आवश्यकतेनुसार बांधकामे (अंदाजे ४५७१० चौ. फुट क्षेत्रावर) करुन देवून उर्वरित जागा विकसकाने विकसित करावयाच्या व महामंडळास विकसनातून जास्तीत जास्त निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रारुप आराखडा तयार करणेसाठी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेस व त्यासाठी आवश्यक निविदा बोलावणेस नियामक मंडळाची तत्वतः मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६८/२२

"ठराव करण्यात येतो की, पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या बारामती शाखेच्या बंद पाईपचे (आरडीपी-१० ते तुकाई टेकडी ) व बारामती तालुक्यातील ६३९८ हेक्टर सिंचन क्षेत्रासाठी निविदेत समाविष्ठ असलेल्या खुल्या कालवा व वितरण पध्दतीऐवजी बंद पाईप वितरण व्यवस्थेची कामे टंचाई परिस्थितीवर मात करणेसाठी तातडीने हाती घेणे आवश्यक आहे.

"मान्य"

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. दीपक रं. कंदी) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६८ वी बैठक दिनांक २८ सप्टेंबर २०११

प्रस्तावित वाढीव कामे पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या संकल्पनातील बदलामुळे निर्माण झालेली असल्याने व योजनेच्या व्याप्तीमधील असल्याने सध्याच्या चालू "क" निविदे अंतर्गत वाढीव कामे म्हणून हाती घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू असल्याने दरम्यानचे कालावधीत कामे हाती घेण्यास मान्यता देण्यात येत असून सुधारित प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही तातडीने पुर्ण करण्यात यावी."

ठराव क्र. ६८/२३

**"ठराव करण्यात येतो की, उजनी धरणाच्या निम्न बाजूस नदीच्या उजव्या तिरावर संपादीत केलेली तथापि सद्यस्थितीत विनावापर असलेली सुमारे ४३.२६ हेक्टर मोकळया जागेवर पब्लिक प्रायव्हेट पार्टीसिपेशन (पी.पी.पी) तत्वावर पर्यटन केंद्र विकसित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

ठराव क्र. ६८/२४

**"ठराव करण्यात येतो की, कालव्यासाठी संपादित केलेले मौजे. तोंडले बोंडले ता. माळशिरस जिल्हा सोलापूर येथील गट क्रमांक ३९/२क व ३९/१ब मधील गोडावूनची जागा वापरात नसल्याने भविष्यात लागणार नाही. यास्तव सदरची गोडावूनची जमीन १.७५ हे. जमीनीची शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे वर्ग करण्याबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

सही/-
**(इंजि. दीपक रं. कंदी)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

सही/-
**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**